पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि. वाशिम
कार्यालय दुरध्वनी क. ०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

दि. २०/१०/२०२१

**पो. स्टे., वाशिम शहर डि.बी. पथकाची कार्यवाही दोन मोटारसायकल चोरांना अटक त्यांच्याकडून ०४ मोटारसायकल, किंमत रू. १,३०,०००/रू. हस्तगत.**

दि. २८/०६/२०१८ रोजी फिर्यादी श्री. शेख मुजीब शेख बाबा, वय ३३ वर्ष, धंदा–मजुरी, रा. गंगू प्लॉट, वाशिम यांनी पोलीस स्टेशन, वाशिम शहर येथे फिर्याद दिली होती की, दि. २६/०६/२०१८ रोजी रात्री ०१:०० ते ०७:०० वाजताच्या दरम्यान त्यांच्या घरासमोर लावलेली त्यांची एच.एफ. डिलक्स मोटारसायकल क. एम.एच. ३७ एक्स. ३०४५ ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली अशा रिपोर्ट वरून वाशिम शहर पोलीस स्टेशन अप. क. २५९/२०१८, कलम ३७९ भा.दं.वि. अन्वये दाखल करण्यात आला.

दि. १६/१०/२०२१ रोजी आरोपी नामे शिवाजी अशोक जाधव, वय २३ वर्ष, धंदा–मजुरी, रा. मोठा गवळीपुरा, वाशिम यास सदर गुन्हयातील चोरीस गेलेल्या मोटारसायकल सह ताब्यात घेउन त्यास सदर गुन्हयात अटक करून मा. न्यायालयासमक्ष हजर करून त्याचा दि. २०/१०/२०२१ रोजीपर्यंत पि.सी.आर. घेण्यात आला. त्यानंतर सदर आरोपीकडे कसून चौकशी केली असता त्याने वाशिम शहरातील गंगू प्लॉट येथून आणखी ०३ मोटारसायकल चोरी केल्याचे सांगितले व त्यापैकी ०२ मोटारसायकल या सिंदखेड राजा, जि. बुलढाणा येथील इसम नामे विलास बाबुराव जाधव यास विकल्याचे व एक मोटारसायकल तो यापुर्वी काम करीत असलेल्या उमरखेड, जि. यवतमाळ येथे ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर त्याच्यासह सिंदखेड राजा येथे जाउन आरोपी इसम नामे विलास बाबुराव जाधव, वय २३ वर्ष, धंदा–मजुरी, रा. जिजामाता नगर झोपडपट्टी, सिंदखेड राजा, जि. बुलढाणा याच्याकडून एच.एफ. डिलक्स कंपनीच्या ०२ मोटारसायकल तसेच उमरखेड, जि. यवतमाळ येथून ०१ हिरो होंडा कंपनीची मोटारसायकल अशा एकूण ०४ मोटारसायकल, किंमत रू. १,३०,०००/– हस्तगत करण्यात आल्या आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. बच्चन सिंह सो., अपर पोलीस अधिक्षक श्री. गोरख भामरे सो., उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. यशवंत केडगे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली व ठाणेदार श्री. धृवास बावनकर यांच्या नेतृत्वाखाली डि.बी. पथकाचे सपोनि खंदारे, पो.ह.क. ३४७/लालमणी श्रीवास्तव, पो.ना.क. ८५६/रामकृष्ण नागरे, पो.शि.क. २१०/मात्रे, पो.शि.क. २४३/विठ्ठल महाले व पो.शि.क. ३०३/संदीप वाकुडकर यांनी पार पाडली असून सदर गुन्हयाचा तपास मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह.क. ३४७/लालमणी श्रीवास्तव हे करीत आहेत.

PI.
(धृवास रामचरण बावनकर)
पोलीस निरीक्षक
पो.स्टे.वाशिम शहर


Shot on OnePlus
owered by Triple Camera